**सर्वसंत स्मृतिदिन**

- **०५ नोव्हेंबर २०२०**
- **उद्दिष्टे – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याप्रती आदरांजली व्यक्त करणे व त्यांचे विचार समजून घेणे.**
- **संक्षिप्त सारांश**

महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा पुण्यतिथी दिन सर्वसंत स्मृतिदिन म्हणून साजरा करण्यात आला. आणि ग्रामगीते द्वारे ग्राम विकासाचा मंत्र सांगणाऱ्या राष्ट्रसंतास आदरांजली अर्पित करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या संस्थेच्या आदर्श असलेल्या पुतळ्यांची मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळच्या पदाधिकाऱ्यांमार्फत पूजा, माल्यार्पण, राष्ट्र वंदना करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्यास संस्थेचे सचिव माननीय श्री. मनोजभाऊ वनमाळी यांनी माल्यार्पण केल, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास संस्थेचे सदस्य श्री. दिपकभाऊ बेहरे, संस्थापक श्री. वामनरावजी वनमाळी यांच्या पुतळ्याची पूजा व माल्यार्पण संस्थेचे सदस्य श्री. उमाकांतजी वनमाळी, संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. श्री. किशोरभाऊ वनमाळी यांच्या प्रतिमेची पूजा व माल्यार्पण संस्थेचे सदस्य श्री. मयुर वनमाळी यांच्याकडून करण्यात आले. यावेळी संस्थेचे कोषाध्याक्ष श्री. हरीचंद्र बोंदरे, सदस्य श्री. अशोक वनमाळी आणि संस्थेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमात महात्मा गांधी कनिष्ठ

महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. साईनाथ अद्दलवार सर, महात्मा गांधी कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. के. टी. किरणापूरे याशिवाय महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी होते. कार्यक्रमाचे आयेजन सांस्कृतिक विभागचे प्रा.शशिकांत गेडाम, प्रा. गजानन बोरकर यांनी केले तर संचालन व आभार प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. स्नेहा मोहूर्ले यांनी सहकार्य केले.

- **सहभागीची संख्या –९८**
- **निष्पत्ती – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याप्रति कृतज्ञता वाहण्यात आली. त्यांचे कार्य समजून घेता आले.**





तुळ्यनगरी दि 06/11/2020

# महात्मा गांधी महाविद्यालयात राष्ट्रसंतांचा स्मृतिदिन

आरमोरी : येथील महात्मा गांधी कला विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा पुण्यतिथीदिन सर्वधर्म स्मृतिदिन म्हणून साजरा करण्यात आला. ग्रामगीताद्वारे ग्राम विकासाचा मंत्र सांगणाऱ्या राष्ट्रसंतांना आदरांजली अर्पित करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या संस्थेच्या आदर्श असलेल्या पुतळ्यांची मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांमार्फत पूजा, माल्यार्पण, राष्ट्रवंदना करून अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्यास संस्थेचे सचिव मनोज वनमाळी यांनी माल्यार्पण केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास संस्थेचे सदस्य दीपक बेहरे, संस्थापक वामनराव वनमाळी यांच्या पुतळ्याची पूजा व माल्यार्पण संस्थेचे सदस्य उमाकांत वनमाळी, संस्थेचे माजी अध्यक्ष किशोर वनमाळी यांच्या प्रतिमेची पूजा व माल्यार्पण संस्थेचे सदस्य मयुर वनमाळी यांच्याकडून करण्यात आले.

यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष हरीचंद्र बोंदरे, सदस्य अशोक वनमाळी व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमात महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य साईनाथ अद्दलवार, महात्मा गांधी कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक के. टी. किरणापुरे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी होते.

कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाचे प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. गजानन बोरकर यांनी केले. संचालन व आभार प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. स्नेहा मोहुर्ले यांनी सहकार्य केले.

. गांधी जयंती

- **०२ ऑक्टोबर २०२०**
- **उद्दिष्टे –महात्मा गांधीजींच्या कार्यांप्रती आदरांजली व्यक्त करणे.**
- **संक्षिप्त सारांश**

महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५१ वी व पूज्य लालबहादूर शास्त्री यांचा संयुक्त जयंती समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या पुतळयांना विधिवत माल्यार्पण करण्यात आले. महात्मा गांधी यांच्या पुतळयास कन्या शाळा समितीचे अध्यक्ष मा. नामदेवरावजी सोरते यांनी पुष्पमाला अर्पण करून पूजन केले. लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. नुरअल्लीभाई पंजवानी यांनी केले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळयाचे माल्यार्पण व पूजन संस्थेचे सहसचिव मा. दिपकजी बेहरे यांनी केले, संस्थेचे माजी संस्थापक व अध्यक्ष स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या पुतळयाचे माल्यार्पण व पूजन संस्थेचे मा. मयूर वनमाळी यांनी केले तर संस्थेचे दिवंगत अध्यक्ष किशोरभाऊ वनमाळी यांच्या प्रतिमचे पूजन संस्थेचे सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी यांनी केले. या कार्यक्रमाला मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी, कोषाध्यक्ष मा. हरिश्चंद्रजी बोंदरे, सदस्य मा. उमाकांतजी वनमाळी, मा. अशोकजी वनमाळी उपस्थित होते. माल्यार्पणानंतर राष्ट्रगीत घेण्यात आले. तत्पूर्वी आरमोरी येथील गुजरी चौकातील महात्मा गांधी यांच्या अर्धकृती पुतळयाला संस्थेचे सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी यांनी माल्यापर्ण व पूजन केले.महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. लालसिंग खालसा यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात संस्थेचे विविध पदाधिकारी, सदस्य, महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ अद्‌दलवार, कन्या विद्यालयाचे मुख्याद्यापक श्री. के. टी. किरणापुरे त्याचप्रमाणे महात्मा गांधी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाचे प्रा. शशीकांत गेडाम, प्रा. गजानन बोरकर, प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे याशिवाय संस्थेच्या सर्व विद्याशाखेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले.

- **सहभागीची संख्या – २८**
- **निष्पत्ती – राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचार आणि कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यांच्या कार्याप्रति कृतज्ञता वाहण्यात आली.**



**Gandhi Jayanti & Lal Bahadur Shastri Jayanti progamme**



पुण्यनगरी दि. 3/10/2020

" महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी : येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या पुतळ्यांना विधिवत माल्यार्पण करण्यात आले. यावेळी नामदेव सोरते, नुरअल्ली पंजवानी, दीपक बेहरे, मयूर वनमाळी, मनोज वनमाळी, हरिशचंद्र बोंदरे, उमाकांत वनमाळी, अशोक वनमाळी, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्राचार्य साईनाथ अद्दलवार, के टी. किरणापुरे, शशिकांत गेडाम, गजानन बोरकर, विजय रैवतकर, ज्ञानेश्वर ठाकरे आदी उपस्थित होते. संचालन विजय रैवतकर यांनी केले.

१०. राष्ट्रीय हुतात्मा दिन

- ३० जानेवारी २०२१
- **उद्दिष्टे –गांधीजींच्या कार्याप्रती आदरांजली वाहणे व त्यांचे कार्य समजून घेणे.**
- **संक्षिप्त सारांश**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी, हुतात्मा दिन म्हणून साजरी केली जाते. या निमित्ताने महाविद्यालयात 'हुतात्मा दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मनोहरभाई शिक्षण मंडळाचे सचिव मा. श्री. मनोजभाऊ वनमाळी यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळयाला सूतमाला अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व स्वर्गीय वामनरावजी वनमाळी यांच्या पूर्णाकृती पुतळयाला क्रमशः मा. श्री. हरिश्चंद्रजी बोंदरे, मा. श्री. गोपालराव कुंभारेयांच्या हस्ते सूतमाला व माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली तसेच स्व. किशोरभाऊ वनमाळी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी हुतात्मा दिनाच्या औचित्याने दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी ऑनलाईन स्वरूपात देशभक्तीपर गीतगायनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपितांवर आणि देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. यात १४ विद्यार्थी व ०२ कर्मचारीवृंदांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमास मनोहरभाई शिक्षण मंडळाचे सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी, उपाध्यक्ष मा. नुरअल्लीभाई पंजवानी, सदस्य मा. गोपालराव कुंभारे, मा. उमाकांतजी वनमाळी, सहसचिव श्री. हरिश्चंद्रजी बोंदरे, श्री. हैदरभाई पंजवानी, संस्थेचे सदस्य श्री. मयूर वनमाळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. साईनाथ अद्दलवार, मुख्याध्यापक डॉ. के. टी. किरणापुरे, मनोहरभाई शिक्षण मंडळ आरमोरी द्वारा संचालित समस्त विद्याशाखेतील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले.

- **सहभागीची संख्या –९९**
- **निष्पत्ती –राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे विचार समजून घेता आले. विद्यार्थ्यांनी प्रसंगी सादर केलेले देशभक्तीपर गीतांतून राष्ट्रभावना जागृत झाली.**



नवराष्ट्र दि. 1/2/2021

# महात्मा गांधी यांना अभिवादन



वार्ताहर@आरमोरी

स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी हुतात्मा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मनोहरभाई शिक्षण मंडळाचे सचिव मनोज वनमाळी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला सुतमाला अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला हरीशचंद्र बोंदरे, गोपालराव कुंभारे यांच्या हस्ते सूतमाला व माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास मनोहरभाई शिक्षण मंडळाचे सचिव मनोज वनमाळी, उपाध्यक्ष नुरअल्ली पंजवानी, सदस्य गोपाल कुंभारे, उमाकांत वनमाळी, सहसचिव हरिशचंद्र बोंदरे, हैदरभाई पंजवानी, संस्थेचे सदस्य मयूर वनमाळी, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्राचार्य साईनाथ अद्दलवार, मुख्याध्यापक डॉ. के. टी. किरणापुरे, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले.

४. राष्ट्रीय एकता दिन

- **दि. ३१ ऑक्टोबर २०२०**
- **उद्दिष्टे – सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याप्रती आदरांजली व्यक्त करणे व त्यांचे राष्ट्रीय एकात्मता विषयक विचार समजून घेणे.**
- **संक्षिप्त सारांश**

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथे सरदार माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जंयती दिन कार्यक्रम प्राचार्य लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाला. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. चंद्रकात डोर्लीकर सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. शशीकांत गडेम, आणि राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. गजानन बोरकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रा. शशीकांत गेडाम यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचे औचित्य स्पष्ट केले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा म्हणाले की आज मोठे देश छोटया देशांना गिळंकृत करीत आहेत. भारताच्या आजूबाजूचे छोटे देश असुरक्षित आहेत. अशा वेळी अनेक संस्थानात विखुरलेल्या भारताचे स्वतंत्र्य कायम रहावे म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांनी अत्यंत दूरदृष्टीचा विचार करून संपूर्ण संस्थाने जोडून एकात्म व समर्थ भारत निर्माण केला. सांस्कृतिक विविधता जोपासून राष्ट्रीय दृष्टीने भारत आज शक्तिशली व स्वयंपूर्ण आहे. यासाठी वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांच्या, एकात्मतेच्या व सांप्रदायिक सद्भाव निर्मितीच्या कार्यावर आजच्या नागरिकांनी अमल केला तर भारताला यांपुढेही चिरकाल सार्वभौम राहता येईल असेही प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा म्हणाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते राज्यशास्त्र विभागाचे प्रा. गजानन बोरकर यांनी परतंत्र भारतातील एकूण पाचशे पासष्ट संस्थान एकत्रित आणण्यात वल्लभभाई पटेल यांची भूमीका अतिशय मुद्देसूदपणे स्पष्ट केली. एकात्म भारत निर्माण करण्यासाठी काही संस्थाने चर्चेतून तरी काही संस्थाने सक्तीने भारताला जोडण्यात सरदार पटेल यांची कार्यशैली किती दूरदृष्टीची होती हे आजच्या शेजारी राष्ट्राच्या अस्थैर्यावरून सिध्द होते. असे प्रतिपादन त्यांनी केले. आणि भारताला सुरक्षित ठेवण्यात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्याचे महत्वसुध्दा प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. शशीकांत गेडाम, संचालन मराठी विभागाचे प्रा. डॉ. विजय रैवतकर तर आभार उपप्राचार्य डोर्लीकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे बहुसंख्य प्राध्यापक, प्राध्यापिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

- **सहभागीची संख्या – २६**
- **निष्पत्ती – सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली व्यक्त करून त्यांचे भारतीय एकात्मता विषयक कार्याचा गौरव केला गेला.**




**Celebration of National Unity Day**



लोकशाही वार्ता दि. 1/11/2020

## लोहपुरुषांनी निर्माण केलेली एकता कायम ठेवण्याची जबाबदारी आपली - डॉ. खालसा

**प्रतिनिधी/ आरमोरी**

लोकपुरुष सरदार पटले यांनी अनेक संस्थानात विखुरलेल्या भारताला अखंड व एकात्म भारताचे स्वरूप आणले. यापुढेही ते एकात्माच राहावे यासाठी सरदार पटेल, इंदिा गांधीचे विचार अमलात आणणे आणि एकात्मता, सद्भावना टिकविणे आपली सर्वांची जबाबदारी ठरते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी केले.

स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम, प्रमुख वक्ते म्हणून प्रा. गजानन बोरकर होते.

प्राचार्य डॉ. खालसा पुढे म्हणाले, आज मोठे देश छोट्या देशांना गिळंकृत करीत आहेत. भारताच्या आजुबाजुचे छोटे देश असुरक्षित आहेत. अशा वेळी संस्थानात विखुरलेल्या भारताचे स्वतंत्र कायम राहावे म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांनी अत्यंत दुरदृष्टीचा विचार करून संपूर्ण संस्थाने जोडून एकात्म व समर्थ भारत निर्माण केला. सांस्कृतिक विविधता जोपासून राष्ट्रीय दृष्टीने भारत आज शक्तीशाली व स्वयंपूर्ण आहे. यासाठी पटेल व इंदिरा गांधी यांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. गजानन बोरकर यांनी परतंत्र भारतातील एकूण ५६५ संस्थांन एकत्रित आणण्यात वल्लभभाई पटेल यांची भूमीका अतिशय मुद्देसुदपणे स्पष्ट केली. एकात्म भारत निर्माण करण्यासाठी काही संस्थाने चर्चेतून तर काही संस्थाने सक्तीने भारताला जोडण्यात सरदार पटेल यांची कार्यशैली किती दूरदृष्टीची होती हे आजच्या शेजारी राष्ट्राच्या अस्थैर्यावर सिद्ध होते, असे सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. शशिकांत गेडाम, संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर तर आभार उपप्राचार्य डोर्लीक यांनी मानले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकांनी सहकार्य केले.